# ❖आता स्टेडियममध्येही सौदी अरेबियातील महिलांना मिळणार प्रवेश !



- महिलांवर असलेले कडक निर्बंध शिथिल करण्याच्या दिशेने सौदी अरेबियामधील प्रशासनाने आणखी एक महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. सौदीमध्ये क्रीडा स्पर्धा पाहण्यासाठी महिलांनाही पुढील वर्षापासून स्टेडियममध्ये प्रवेश करण्याची परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
- काही दिवसांपूर्वीच सौदी अरेबियामध्ये महिलांना वाहन चालविण्याची परवानगी देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला होता. या निर्णयाची अंमलबजावणी पुढील वर्षी जूनपासून होणार आहे. देशात सामाजिक बदल करण्याच्या दृष्टीने सौदी अरेबियाचे नवे युवराज महंमद बिन सलमान यांनी महत्त्वाकांक्षी निर्णय घेण्यास सुरवात केली आहे.
- आता संपूर्ण कुटुंबाला रियाध, जेद्दाह आणि दम्मान येथील स्टेडियममध्ये सामावून घेण्यासाठीचे प्रयत्न सुरू झाले आहेत. ही सुविधा पुढील वर्षाच्या सुरवातीपासून उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असेल, असे सौदी अरेबियामधील क्रीडा विभागाने जाहीर केले. आता स्टेडियममध्ये रेस्टॉरंट्स, कॅफे आणि स्क्रीन्स उभारले जाणार आहेत. गेल्या महिन्यात राष्ट्रीय दिनानिमित्त प्रथमच फुटबॉल सामन्यांसाठी महिलांना स्टेडियममध्ये प्रवेश देण्यात आला होता.
- सौदी अरेबियामध्ये नजीकच्या भविष्यात चित्रपटांवरील बंदीही हटविण्यात येण्याचा निर्णय घेतला जाऊ शकतो. तसेच, स्त्री-पुरुषांनी एकत्र सण-उत्सव साजरे करण्यासही प्रोत्साहन दिले जाऊ शकते. देशातील कट्टरवाद्यांकडून महंमद बिन सलमान यांच्या 'मॉडरेट सौदी अरेबिया' या महत्वाकांक्षी मोहिमेला विरोध होऊ शकतो, अशी भीतीही व्यक्त करण्यात येत आहे.